"श्रीराम"

ध्यानी, मनी वसतो राम
मुखी सदैव तयाचे नाम ----

श्रध्दा, भक्ति प्रभुश्रीरामावर
भाव निस्सीम अर्पिला तर
सार्थक जीवनाचे होणार खरोखर
चरणकमलाशी प्रभुपदाच्या मिळे खरा विश्राम -------

भिस्त श्रीरामावर टाकुनी सारी
सुखदुःख अनुभवता संसारी
तारतसे 'सीताराम' भक्तास वरचेवरी
कृपासिंधू पुरुषोत्तम हेच खरे सुखधाम ---

रामानंदी तल्लीन होता अर्थ उमगती नवे नवे
कवच रामरक्षेचे म्हणूनी सदैव जवळी हवे
एकमुखाने गजर करुया, टाळमृदंगासवे
श्रीराम जयराम जयजय राम -----



सौ. विजया पुरुषोत्तम जोशी.